दैनिक www.esuryodaylive.com Email : d suryodaykokan.123@gmail.com

महाराष्ट्र

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे

भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती)








कोकण || वर्ष ५ वे || अंक १९६ || शनिवार ०५ जुलै २०२५ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||


# रायगडात एका दिवसात ६ मुलींवर बलात्कार , रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी दावा फेटाळला

## काँग्रेस नेते माजी मंत्री विजय वडेट्टीवार यांचा आरोप रायगड पोलीस अधीक्षकांनी फेटाळला



विशेष प्रतिनिधी.(धम्मशील सावंत)रायगड जिल्ह्यात एका दिवसात ६ मुलींवर बलात्कार झाल्याचा धक्कादायक आरोप काँग्रेस नेते , माजी मंत्री विजय वडेट्टीवार यांनी केला होता, मात्र ङ्ग ही माहिती चुकीचे असल्याचे स्पष्टीकरण रायगड जिल्हा पोलिस अधीक्षक आंचल दलाल यांनी दिले आहे. तळा पोलीस स्थानकात हे एफआय आर दाखल आहेत, या वेगवेगळ्या काळात घटना घडल्या आहेत, यामध्ये पोलिसांनी पुढाकार घेऊन गुन्हे दाखल केले असल्याचे आंचल दलाल म्हणाल्या. तळा तालुक्यात आशा वर्कर ने वेगवेगळ्या आदिवासी वाड्यात जाऊन आरोग्य चिकित्सा शिबीर घेतले होते, यामध्ये पाच अल्पवयीन मुली गर्भवती असल्याचे निदर्शनास आल्यानंतर यासंदर्भात तळा पोलीस स्थानकात कायदेशीर गुन्हे दाखल केल्याची माहिती पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी दिलीय. तर रायगड जिल्ह्यातील जनतेची सुरक्षा , समाजात शांतता एकोपा व सुव्यवस्था राखणे याबरोबरच गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी रायगड पोलीस प्रशासन पुरेपूर सज्ज व दक्ष असल्याचे पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी म्हटले.

## वडखळ अलिबाग मार्गावर शनिवार-रविवारी जड वाहनांची वाहतूक बंद

### पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी जिल्हाधिकारी किशन जावळे यांचा निर्णय

विशेष प्रतिनिधी (धम्मशील सावंत)

जिल्ह्यातील पर्यटनस्थळांकडे येणाऱ्या मोठ्या प्रमाणातील पर्यटकांच्या सुरक्षित प्रवासासाठी आणि वाहतूक कोंडी टाळण्यासाठी अलिबाग ते वडखळ राष्ट्रीय महामार्ग क्र. १६६ ए या मार्गावर दर शनिवार व रविवार जड-अवजड वाहनांच्या वाहतुकीवर बंदी घालण्यात आली आहे, अशी अधिसूचना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जारी केली आहे.ङ्गङ्गया महामार्गावरून मोठ्या प्रमाणात पर्यटक आपल्या खासगी वाहनांद्वारे येत असल्याने दर आठवड्याच्या शेवटी येथे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होते. यामुळे रुग्णवाहिकांना अडथळा, तसेच अपघाताची शक्यता वाढते. पोलिस अधीक्षक रायगड यांनी सुचविलेल्या उपाययोजनांच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे.ङ्गङ्गवाहतूक बंदीचे वेळापत्रक,ङ्गशनिवार: सकाळी ८ ते दुपारी २,रविवार: दुपारी २ ते रात्री ९ वाजेपर्यंत असे राहील.ङ्गङ्गजड-अवजड वाहने (ट्रक, कंटेनर, डंपर इ.) इत्यादी वाहनांना बंदी असेल.तर दूध, डिझेल, पेट्रोल, एलपीजी गॅस,औषधे, ऑक्सिजन, भाजीपाला व जीवनावश्यक वस्तू वाहतूक करणारी वाहने,रुग्णवाहिका, पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, महिला सशक्तीकरण मोहिमेसाठी नेमलेली वाहने यांना या कालावधीत मुभा असेल.ङ्गङ्गहा आदेश तत्काळ प्रभावाने लागू करण्यात आला



असून पुढील आदेश येईपर्यंत तो लागू राहील. स्थानिक नागरिक व पर्यटकांना यामुळे सुरक्षित, सोयीस्कर व अडथळा विरहित प्रवासाचा अनुभव मिळेल.ङ्गङ्गवाहनचालक व नागरिकांनी सहकार्य करावे, वाहतूक बंदीच्या वेळा लक्षात घेऊन प्रवासाचे नियोजन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.

## अलिबाग येथे ४ जुलै सरखेल कान्होजी राजे आंग्रे यांच्यी २९६ व्वी पुण्यतिथी साजरी

अलिबाग प्रतिनिधी ( प्रमिला जोशी)

भारतीय नौसेने तर्फे सरखेल कान्होजी राजे आंग्रे यांना४ जूलै रोजी पुण्यतीथी निमित्त मानवंदना देण्यात आली. त्या प्रसंगी कमांडींग ऑफिसर आंग्रे, कीसन जावळे जिल्हाधिकारी रायगड जिल्हा पोलिस अधीक्षक श्रीमती आंचल दलाल , रायगड जिल्हा परिषद मुख्याधिकारी श्रीमती नेहा भोसले माजी नगराध्यक्ष श्री प्रशांत नाईक, सौ मानसी म्हात्रे,अनेक पतसंस्थांचे पदाधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.ङ्गङ्गत्यानंतर राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टीलायझर्स लिमिटेड च्या कम्युनिटी सेंटर मध्ये गाज फाउंडेशन च्या माध्यमातून आणि राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टीलायझर्स लिमिटेड च्या सक्रिय सहयोगाने परिसरातील दहावी आणि त्यापुढील विद्यार्थ्यांसाठी " " या नावाने मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले. भारतीय नौसेनेतील करिअरच्या संधी यासंबंधी मार्गदर्शन शिबिरात भारतीय नौसेना पोत आंग्रे चे कमांडिंग ऑफिसर कमोडोर दीपक सिंघल तसेच त्यांचे इतर सहकारी यांनी



मार्गदर्शन केले. परिसरातील विद्यार्थ्यांसाठी ही एक मोठी संधी होती. यामुळे अलिबाग तालुक्यातील विद्यार्थ्यांना नौसेनेतील भविष्यकालीन संधी संबंधित उत्तम मार्गदर्शन झाले. सदर कार्यक्रमासाठी गाज फाउंडेशनचे अध्यक्ष रघुजीराजे आंग्रे, उपाध्यक्ष डॉक्टर निशिगंध आठवले, श्री अभिजीत आयरे, इतर सर्व ट्रस्टी, परिसरातील विविध शाळांचे शिक्षक, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, सागरी सीमा मंच, जे एस एम महाविद्यालयातील एन.सी.सी. पथक यांनी प्रयत्न केले. या कार्यक्रमात परिसरातील ९२७ हून अधिक विद्यार्थी आणि शिक्षकांचा सहभाग लाभला. यापुढे देखील गाज फाउंडेशनच्या वतीने असे अनेक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. लवकरच पावसाळा संपल्या नंतर सैन्य दल , नौसेना आणि वायुसेना असे तिन्ही सेना दलांसाठी एकत्र मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात येणार आहेत.

## डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाचे नवनिर्वाचित कुलसचिव डॉ.संतोष सावर्डेकर यांची शरदचंद्रजी पवार कृषि महाविद्यालयास सदिच्छा भेट

आबलोली (संदेश कदम)

चिपळूण तालुक्यातील शरदचंद्रजी पवार कृषी महाविद्यालय, खरवते-दहिवली येथे डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोलीचे नवनिर्वाचित कुलसचिव डॉ.संतोष सावर्डेकर यांनी नुकतीच सदिच्छा भेट दिली. कुलसचिव पदी नियुक्ती झाल्यानंतर प्रथमच डॉ.संतोष सावर्डेकर यांनी महाविद्यालयाला सदिच्छा भेट दिली.या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुनितकुमार पाटील यांनी त्यांचे स्वागत व सत्कार केला. यावेळी डॉ.संतोष सावर्डेकर यांनी सह्याद्रि शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष व चिपळूण संगमेश्वर मतदार संघाचे आमदार शेखरजी निकम यांचे विशेष आभार मानत सह्याद्रि परिवाराशी असणाऱ्या जिव्हाळ्याच्या नात्याला उजाळा दिला.



स्वर्गीय माजी खासदार गोविंदरावजी निकम साहेबांच्या आशिर्वाद व पाठिंब्यावर आपले सर्व शिक्षण पुर्ण झाले.त्यांनी दिलेला आधार व आपुलकी याला मी कधीही उतराई होवू शकत नाही तसेच आमदार शेखर निकम यांचे सहाय्य मी विसरु शकत नाही असे प्रतिपादन कुलसचिव डॉ.संतोष सावर्डेकर यांनी केले व येणाऱ्या काळामध्ये शरदचंद्रजी पवार कृषि महाविद्यालयास माझे संपूर्ण सहकार्य राहील असे आश्वासन दिले.या वेळी सह्याद्रि क्रीडा प्रबोधिनी चे अध्यक्ष अनिरुद्ध निकम,महाविद्यालयाचे कृषि विभाग प्रमुख डॉ.हरिश्चंद्र भागडे व सर्व प्राध्यापक वर्ग उपस्थित होते.

## दापोलीत धक्कादायक प्रकार ; पाच वर्षाच्या बालकाला विकणाऱ्या आईसह एकाला अटक

दापोली प्रतिनिधी ०४: माणुसकीला काळीमा फासणारी घटना समोर आली आहे. आर्थिक फायद्यासाठी आपल्याच ५ वर्षांच्या मुलाला विकल्याप्रकरणी एका मातेसह एका व्यक्तीविरोधात दापोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी दोघांनाही अटक केली आहे. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २६ जून रोजी दुपारी १२.३० वाजण्याच्या सुमारास गुहागर येथील एस.टी. स्टँडसमोर हा प्रकार उघडकीस आला. आरोपी महिला हिने तिच्या ५ वर्षाच्या मुलाला आर्थिक फायद्यासाठी आरोपी सत्यवान दत्ताराम पालशेतकर (वय ५२, रा. बोऱ्या कारुळ, ता. गुहागर, जि. रत्नागिरी) याला विकले. सत्यवान पालशेतकर याने सदर बालकाची खरेदी केल्याचे उघड झाले आहे.

या गंभीर घटनेप्रकरणी दापोली पोलीस ठाण्यात गुन्हा बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या कलम ८१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ङ्ग गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षकश्रीमती हिरेमठ यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

## संपादकीय

### झाडांचे वाटप

मनुष्याला आपले जीवन जगण्यासाठी मूलभूत गरजा दिल्या आहेत. त्यामुळे जे काय मनुष्याचे अस्तित्व आहे ते झाडांमुळेच. तेव्हा मनुष्याला ज्या प्रमुख जीवनावश्यक वस्तू मिळतात त्या झाडांमुळे. त्यामुळे झाडे लावा, झाडे जगवा असे म्हणत असतो. अशी मोहीम शासकीय स्तरावर सुद्धा करण्यात आली आणि आजही ती चालू आहे. आता मात्र परिस्थिती वेगळी आहे. दिवसेंदिवस झाडांचे प्रमाण कमी होत आहे. त्यामुळे आता झाडे लावा, झाडे वाचवा अशी म्हणण्याची वेळ आपल्यावर आली आहे. तेव्हा हा संशोधनाचा महत्त्वाचा भाग जरी असला तरी प्रत्येकाने पावसाळ्यात किमान एक तरी झाड लावले पाहिजे. जी झाडे तोडली जातील त्यांना विरोध केला पाहिजे. एक झाड तोडल्यास किमान दोन झाडे लावली पाहिजेत. तरच झाडे वाचतील आणि पर्यावरणपूरक वातावरण राहील.

पृथ्वीवर आज जे काही मानवाचे अस्तित्व आहे त्याचे एकमेव कारण म्हणजे वृक्ष. त्यासाठी नागरिकांना झाडांचे महत्त्व समजून सांगितले पाहिजे. आज राज्यातील प्रत्येक गावामध्ये झाडे लावा, झाडे वाचवा हा उपक्रम राबविला गेला पाहिजे. तसेच या उपक्रमाबरोबर आज पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी ‘एक व्यक्ती एक झाड’ लावले पाहिजे. हा उपक्रम प्रत्येक घराघरात राबवायला हवा. तरच वाढत्या तापमानाला आळा बसेल. त्यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती करणे गरजेचे आहे. तरच नागरिक झाडे लावण्यास व त्यांचे संगोपन करण्यास प्रोत्साहित होतील. तेव्हा झाडे लावण्यासाठी त्यांना प्रोत्साहित केले पाहिजे. झाडांचे महत्त्व नागरिकांना पटवून दिले पाहिजे. आपण झाडांशिवाय जगू शकत नाही. हे नागरिकांना पटवून सांगितले पाहिजे. गावात झाडे वाचविण्यासाठी जनजागृती रॅली काढली पाहिजे. गावामध्ये मोक्याच्या ठिकाणी झाडांचे महत्त्व सांगणारे फलक लावले पाहिजेत. गावातील नागरिकांना जागृत करण्यासाठी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून व्याख्याने आयोजित करावीत. गाव पातळीवर प्रत्येक घरानुसार झाडांचे वाटप करावे. रस्त्याच्या दोन्ही बाजूला झाडांची लागवड करावी. मात्र याचे आजच्या नवीन पिढीला काहीही देणे-घेणे नाही असेच दिसते. घरात कृत्रिम थंडगार हवा असली म्हणजे झाले. त्यासाठी आई-वडील काय करतात त्याचे त्यांना काहीच देणे नसते. झाडे लावण्यापेक्षा घरात मनीप्लँट लावणे मुले पसंत करतात. म्हणे यामुळे घरात पैसा येतो, इतका अडाणीपणा. तेव्हा सर्वांनी झाडांचे महत्त्व लक्षात घेतले पाहिजे. पुढील वर्षी असे न म्हणता, या वर्षापासून मी झाडे लावून त्यांचे मी संगोपन करेन असे ध्येय प्रत्येकांनी ठेवले पाहिजे. कारण आपल्याला झाडे प्राणवायू देत असतात याची जाणीव असायला हवी. एकवेळ घनदाट दिसणारी हिरवीगार जंगले आता ओसाड दिसत आहेत. ज्याठिकाणी सुपीक जमीन होती त्या जमिनीतून शेतकरी राजा सोन्याचे गोठे पिकवत होता. आता त्याठिकाणी सिमेंटच्या गगनचुंबी इमारती दिसत आहेत. याचे कारण मानवाच्या गरजांमुळे झाडांची कत्तल होताना दिसत आहे. त्यामुळे जास्त उकाडा आणि पावसाचे कमी होत जाणारे प्रमाण याला आपणच जबाबदार आहेत. झाडांमुळे आपल्याला पुरेशी शुद्ध हवा, पिण्यासाठी पाणी व हवामान नियंत्रित करण्यात मदत होते. कारण झाडे ही नैसर्गिक संसाधने मानवाला पुरवीत असतात. आतापर्यंत आपण झाडे लावा, झाडे जगवा असे पावसाळा सुरू झाल्यावर म्हणत होतो. आता तसे म्हणून चालणार नाही. तसेच झाडांना खड्डे खोदून चालणार नाही.अलीकडे खोदलेले खड्डे सुद्धा चोरीला जातात. तेव्हा अगोदर झाडांची रोपे घेऊन येऊन जसे खड्डे खोदले जातील त्याप्रमाणे रोपे सुद्धा लावली पाहिजे. झाडांच्या सुरक्षिततेसाठी कुंपण सुद्धा घातले पाहिजे. झाडे लहान असताना त्याची देखभाल करावी. तसेच झाडे मोठी झाल्यावर ती तोडणार नाहीत याची काळजी घेण्यात यावी.आपण सर्वजण दरवर्षी ५ जून हा जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा करीत असलो तरी जागतिक तापमानात वाढ होत आहे, याचा विचार होणे आवश्यक आहे. तसेच या दिवशी पर्यावरणाच्या संरक्षणासाठी पर्यावरणविषयक जागरूकता आणि कृती कार्यक्रम आयोजित केले जातात. हा दिवस आपल्या देशात ‘जंगले निसर्ग तुमच्या सेवेत’ आणि ‘प्लास्टिक प्रदूषणावर मात करा’ या थीमसह आयोजित केला आहे. जागतिक पर्यावरण दिनाची आपल्या देशातील थीम लक्षात घेऊन देशातील तापमानाचा विचार करता पुढील वर्षी ‘झाडे लावा, झाडे वाचवा’अशी थीम भारत सरकारने जाहीर करावी. त्या अगोदर देशातील प्रत्येक नागरिकांनी झाडे लावा,स झाडे वाचवा वचन बद्ध होऊ या.

# राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विद्यार्थ्यांनी घेतला भातलावणीचा आनंद

मंडणगड (प्रतिनिधी) दि. : सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाच्या लोकनेते गोपीनाथजी मुंडे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवकांनी बोरघर-उतेकरवाडी येथील शेतात ग्रामस्थांसोबत भातलावणीचा आनंद घेतला. या उपक्रमात ग्रामस्थ, प्रभारी प्राचार्य डॉ. वाल्मिक परहर, रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी प्रा. संदीप निर्वाण, डॉ. संगीता घाडगे, डॉ. महेश कुलकर्णी आदी मान्यवर सहभागी झाले होते. ङ्गसुरुवातीला ग्रामस्थांकडून भातरोपे काढणे, भातासाठी शेत तयार करणे व भातलावणी कशा पध्दतीने लावणी करावी लागते याची सर्व स्वयंसेवकांनी माहिती करुन घेतली. त्यानंतर स्वयंसेवकांनी शेत नांगरुण घेतले व पारंपारीक पध्दतीने भाताची रोपे काढून भातलावणी करत भातलावणीचा आनंद घेतला. ङ्गयावेळी कार्यक्रमाधिकारी प्रा. संदीप निर्वाण यांनी हा उपक्रम खरे तर स्वयंसेवकांमध्ये शेतीविषयक एक चांगला



सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करणारा ठरला असून ग्रामीण भागातील जीवनशैली अनुभवण्याची एक चांगली संधी आपल्याला लाभली आहे असे सांगितले तर प्रभारी प्राचार्य डॉ. वाल्मिक परहर यांनी हा उपक्रम ग्रामीण भागातील जीवन समजून घेण्याचा आहे. अशा प्रकारचे समाजपयोगी व प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना अनुभव देणारे उपक्रम यापुढेही राबविण्यात येतील असे त्यांनी यावेळी सांगितले. ङ्गया उपक्रमात उपप्राचार्य डॉ. विष्णु जायभाये, प्रा. संजयकुमार इंगोले, ग्रंथपाल डॉ. दगडू जगताप तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवक-स्वयंसेविका यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. शेवटी डॉ. महेश कुलकर्णी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# शेतकऱ्यांसाठी मोठी बातमी, महाडीबीटी पोर्टलवर कृषी यांत्रिकीकरण योजनेतील लाभार्थ्यांची यादी जाहीर व अर्ज सुविधा उपलब्ध

रायगड जिल्हा उत्तर

उपसंपादक/मंगेश यादव:महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या कृषी यांत्रिकीकरण योजनेसाठी २०२५२६ या वर्षी अर्ज केलेल्या शेतकऱ्यांची लॉटरी पद्धतीने निवड यादी जाहीर करण्यात आली आहे.ङ्ग ज्यांची निवड झाली आहे, त्यांनी आता आवश्यक कागदपत्रे लवकरात लवकर अपलोड करावीत. पुढील ७ दिवसांच्या आत प्रक्रिया पूर्ण न केल्यास अनुदानाचा लाभ मिळणार नाही.ङ्ग यादी कशी पाहाल.**mahadbt.maharashtra.gov.in** या अधिकृत पोर्टलवर लॉगिन करा. निवडा. युजरनेम आणि पासवर्ड टाकून लॉगिन करा. विभागात कृषी यांत्रिकीकरण योजना निवडा. तपासा. निवड झाल्यास ‘‘‘‘ दर्शवले जाईल.ङ्गआवश्यक कागदपत्रे : ङ्ग१. ७/१२ उताराङ्ग२. शेतजमिनीचा होल्डिंग प्रमाणपत्रङ्ग३. कोटेशन (यंत्रासाठी)ङ्ग४. टेस्ट रिपोर्ट (लागू असल्यास)ङ्ग५. वाहनाचा बुक (जर ट्रॅक्टरसारखी यंत्रे असतील तर)ङ्ग६. आधार कार्ड व बँकपासबुकची झेरॉक्सङ्गअपलोड करताना कागदपत्रे स्पष्ट, वाचनीय आणि योग्य स्वरूपात असावीत. एकदा निवड झाली तरी अंतिम मंजुरीपूर्वी सर्व कागदपत्रांची पडताळणी होते. वेळेत प्रक्रिया पूर्ण न केल्यास निवड रद्द होऊ शकते. मदतीसाठी तालुका कृषी अधिकारी किंवा जवळील केंद्राशी संपर्क साधावा.ङ्गजगन्नाथ कंठाळे...... सहाय्यक कृषी अधिकारी.




# इंग्लिशवरील अफाट प्रभुत्वाने पेझारीचे प्राचार्य मारोती भगत यांचा जगात गाजतोय डंका : आशिया खंडातून इंग्लिश टीचर या इंग्रजी विषयाच्या जागतिक स्पर्धेत पटकाविला प्रथम क्रमांक

विशेष प्रतिनिधी.(धम्मशील सावंत)रायगड जिल्ह्यातील पेझारी येथील को.ए.सो लक्ष्मीङ्गशालिनी महिला महाविद्यालयाचे माजी प्राचार्य मारोती भगत यांनी स्पेनमधील तेज इंग्लिश

अकॅडमी या संस्थेने घेतलेल्या इंग्लिश टीचर याङ्गइंग्रजी विषयाच्या जागतिकङ्गस्पर्धेत दैदिप्यमान यश संपादन केलेय. जागतिक स्पर्धेत प्राचार्य भगत यांनी जगात प्रथम क्रमांक पटकविण्याची प्रेरक व अभिमानास्पद कामगिरी केलीय. ग्रामीण भागात राहून आशिया खंडात संपूर्ण भारत देशाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या प्राचार्य भगत यांच्या या कामगिरीने रायगड सह भारत देशाच्या नावलौकीकत भर पडली आहे. इंग्लिशवरील अफाट प्रभुत्वाने, असखलीत इंग्रजी संभाषण कौशल्याने प्राचार्य मारोतीङ्ग




भगत यांचा जगात डंका गाजतोय. ङ्गस्पेनमधील तेज इंग्लिशङ्गअकॅडमी ही संस्थाङ्गदर आठवड्याला विविधङ्गजागतिक ऑनलाईन स्पर्धांचेङ्गआयोजन करते. गेल्या ११ आठवड्यापासून १५ङ्गते २१ जून या कालावधीत घेण्यात आलेल्या याङ्गस्पर्धांमध्ये प्राचार्य भगत यांनी सहभाग नोंदवूनङ्ग७६७९ गुण प्राप्त करून त्यांनी प्रथम क्रमांकाचाङ्गमानकरी होण्याचा बहुमान प्राप्त केलाय. प्राचार्य भगत यांचा मूळ इंग्रजी विषय नाही. त्यांनी सेवाङ्गनिवृत्तीनंतर इंग्रजी विषयाचा व्यासंग वाढवत इंग्रजीङ्गविषयाच्या स्पर्धेत सहभाग घेतला आहे. भगत यांनी आपलाङ्गइंग्रजी विषयाचा व्यासंग जागतिक पातळीवर सिद्ध केलाय.अत्याधुनिक तंत्रज्ञानात मोबाईलचा वापर विकसित होताना पालकांनी केवळ विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी,ज्ञान वृद्धीसाठीच मोबाइलचा वापर करावा,तर इतर कामासाठी मोबाईल वापर टाळावा, असा सल्ला भगत यांनी दिला. विद्यार्थ्यांना इंग्लिश वर प्रभूत्व मिळावे यासाठी आपण इंग्लिशचे मोफत क्लासेस घेत असल्याची माहिती प्राचार्य भगत यांनी यावेळी दिली. मुलांनी आपल्या मोबाइल चा वापर अभ्यास क्रमासाठी द्यावा. मुलांनी निरनिराळे गेम पाहिले की तें व्हायपर होतात, त्यांचा बुद्ध्यांक हळूहळू कमी होतो. असे भगत म्हणाले. ङ्गइंग्रजीची कोणतीही मनात भीती न बाळगता इंग्लिशचा व्यासंग वाढवून इंग्रजी बोलणाऱ्या लोकांच्या सानिध्यात राहून इंग्रजीत बोलण्याचा प्रयत्न केला तर लवकर इंग्लिश शिकता येते असा सल्ला प्राचार्य भगत यांनी दिलाय.

# आदिवासी समाजातून वकील झालेले रमेश पवार हे समस्त तरुणांसाठी आयडॉल– डॉ. संजय सोनावणे यांचे गौरवोद्गार, आदिवासी समाजातून वकील झाल्याबद्दल लोकशक्ती संजीवनी प्रतिष्ठाण तर्फे डॉ. संजय सोनावणेंनी ऍड: रमेश पवारांचा केला सत्कार



सुधागड (धम्मशील सावंत) सुधागड तालुक्यातील जांभुळपाडा हद्दीतील घोडपापड आदिवासी वाडीतील रहिवासी आणि आदिवासी समाजाचे नेते रमेश पवार यांनी नुकतीच कायद्याची पदवी मिळवली आहे. अविरत परिश्रम, जिद्द, चिकाटीच्या जोरावर रमेश पवार वकील झाले. खडतर परिस्थितीवर मात करीत आदिवासी समाजातून चांगल्या गुणांनी कायद्याची पदवी मिळवून वकील झालेले रमेश पवार हे समस्त तरुणांसाठी आयडॉल असल्याचे गौरवोद्गार लोकशक्ती संजीवनी प्रतिष्ठान चे राज्य अध्यक्ष,

नामवंत उद्योजक, तथा ज्येष्ठ समाजसेवक डॉ.संजय सोनावणे यांनी काढले. यावेळी डॉ. संजय सोनावणेङ्गयांनी ऍड: रमेश पवार यांचे कौतुक करीत शाबासकी देत पाठ थोपटली. तर सत्कार प्रसंगी बक्षीस व पहिल्या कामाचा मोबदला म्हणून एक धनादेश देखील यावेळी सुपूर्द केला. तसेच कायम अन्यायाविरुद्ध व शोषित पीडित वंचित घटकाच्या न्याय हक्कासाठी लढण्याचे मार्गदर्शन देखील केले. ङ्ग आदिवासी बहुजन समाजात लोकशिक्षणाची चळवळ

गतिमान करा, रोजगारासाठी होणारे आदिवासी कातकरी बांधवांचे स्थलांतर थांबवण्यासाठी प्रयत्न करा, गायरान जमिनी तसेच कूळकायदा व इतर जमिनी विषयी प्रकरणांमध्ये लक्ष द्यावे. याशिवाय गोरगरीब आदिवासी वंचित नागरिकांच्या न्याय हक्कासाठी लढा द्या असे डॉ सोनावणे यांनी सांगितले. समाजातील उपेक्षित वंचीत घटकांवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराला कायद्याने वाचा फोडा,

रायगड सह कोकणात शेतकरी, कामगार व महिला वर्गाचे अनेक प्रश्न व समस्या आहेत, त्या सोडविण्यासाठी पुढाकार घ्या, माझे आपणास कायम सहकार्य व पाठिंबा असेल,आदिवासी बांधवांच्या समस्या मार्गी लावण्यासाठी कायद्याच्या चौकटीत राहून काम करा असा मार्गदर्शक सल्ला डॉ. सोनावणे यांनी दिला. रमेश पवार यांनी कायद्याची पदवी घेतल्याने आदिवासी समाजाबरोबर च बहुजन समाजातील तरुणांपुढे एक प्रेरणा आदर्श उभा राहिला आहे. ङ्गआदिवासी समाजातील होतकरू तरुण एल एल बी परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल त्यांचा विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून , सामाजिक संस्था संघटना यांच्याकडून सत्कार होत आहे.

# भारतीय स्टेट बँक सेवानिवृत्त शिवाजी बाबुराव कदम यांचा सेवानिवृत्त सोहळा संपन्न

रायगड जिल्हा उत्तर उपसंपादक/मंगेश यादव: पाली भारतीय स्टेट बँकेत शिवाजी बाबुराव कदम हे कार्यरत होते. त्यांनी त्यांच्या सेवेत भिवंडी, खोपोली, शायनिंग, पेडली, नागोठणे, पाली अशा विविध शाखांमध्ये तागायत, यशस्वी व निस्वार्थीपणे सेवा केली. दिनांक ३०/६/२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पावन भूमीत व श्री बल्लाळेश्वर पवित्र भूमी सेवानिवृत्त झाले. भारतीय स्टेट बँक शाखा पाली यांच्या वतीने पाली शाखा येथे शाखा अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वतीने त्यांनी १८ वर्ष मनापासून ग्राहकांची सेवा केली तसेच कर्मचारी वर्गाबरोबर आपुलकीचे सबंध जपले. खेळीमेळीचे वातावरणात काम केलं त्यांची पोचपावती म्हणून पाली शाखा अधिकारी व कर्मचाऱ्यांनी यांच्या उपस्थितीत पत्नी सोबत फुल गुच्छ व श्री बल्लाळेश्वराचे तसबीर देऊन त्यांचे स्वागत केले व पुढील दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. अशाप्रकारे निरोप समारंभाचा कार्यक्रम आनंदात संपन्न झाला.



# लोकरंग

## १ साप्ताहिक संवाद


सबसे पहले लाईफ इन्शुरन्स जनजागरण मोहीम ङ्ग२०४७ पर्यंत सर्वांसाठी विमा हे केंद्र सरकारचे उद्दिष्ट आहे.त्याच अनुषंगाने म्युच्युअल फंड उद्योगाची संघटना अँफीने राबविलेल्या म्युच्युअल फंड सही है या मोहिमेच्या धर्तीवर आयुर्विमा क्षेत्राची प्रातिनिधिक संघटना लाईफ इन्शुरन्स कौन्सिलच्या विमा जागरूकता समितीने सबसे पहले जीवन बिमा या घोषवाक्यासह विम्या संदर्भात जनजागरण मोहीम सुरु केली आहे. याच निमित्ताने विमा जागरूकता समितीचे अध्यक्ष कमलेश राय यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद. ङ्ग१सर्वसामान्यांना आर्थिक आधार देणाऱ्या विम्याबद्दलची सद्यस्थिती नेमकी काय आहे?ङ्गमागे



कोरोनाची साथ आली होती त्या काळात जनमानसात विम्याबद्दल सर्वसामान्यांना प्रचंड आस्था निर्माण झाली होती. मात्र मागील काही वर्षांपासून विम्याच्या प्रसाराला उतरती कळा लागली आहे. कंपन्यांनी गोळा केलेल्या एकूण प्रिमिअम ची रक्कम हि आर्थिक वर्ष २०२४–२५ मध्ये देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादन अर्थात जीडीपी च्या तुलनेत ३. २ टक्के आहे. देशातील विम्याच्या सखोलतेचे हे मापन आधीच्या वर्षापेक्षा कोरोना काळात थोडे वाढले इतकेच. ङ्ग२ सबसे पहले लाईफ इन्शुरन्स हि जनजागरण मोहीम नेमकी काय आहे?ङ्गविविध प्रकारच्या जीवनरक्षक विम्याबद्दल जनमानसात मोठ्या प्रमाणात जागृती व्हावी यासाठीच देशातील आयुर्विमा क्षेत्रातील कंपन्यांनी एकत्रितपणे पावले टाकत आगामी ३ वर्षात जनजागरणाच्या मोहिमेवर ४५० कोटी रुपये खर्चाच्या नियोजनाची घोषणा केली आहे. याच अनुषंगाने आयुर्विमा क्षेत्राची प्रातिनिधिक संघटना लाईफ इन्शुरन्स कौन्सिलच्या विमा जागरूकता समितीने सबसे पहले जीवन बिमा या घोषवाक्यासह हि मोहीम सुरु केली आहे. या मोहिमेसाठी सर्व आयुर्विमा कंपन्यांचे त्यांच्या प्रिमिअम उत्पनांच्या आधारावर योगदान असेल. सामान्य कंपन्यांपैकी अलीकडेच अच्छा किया इन्शुरन्स लिया असा संदेश देणारी प्रसार मोहीम सुरु केली आहे. ङ्ग३ आयुर्विमा जनजागृती हि शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट केली जाणार आहे का?ङ्गजीवनरक्षक कवच असलेला आयुर्विमा हा प्रत्येकाला आवश्यक आहे. आयुर्विम्याच्या माध्यमातून पॉलिसीधारक स्वत:साठी तसेच त्याचे काही बरेवाईट झाल्यास त्याच्या पश्चात टायच्या कुटुंबासाठी आर्थिक तरतूद करतो. त्यामुळे आयुर्विम्याची माहिती शालेय वयापासून मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे शालेय अभ्यासक्रमातून आयुर्विमा विषय शिकवला जावा यासाठी लाईफ इन्शुरन्स कौन्सिल प्रयत्न करणार आहे.ङ्ग२ नोंद ङ्गएक्सारो टाइल्सचे वार्षिक ऊर्जा खर्चात अंदाजे ₹५.६७ कोटी बचतीचे लक्ष्यङ्गङ्गएक्सारो टाइल्स लिमिटेड भारतातील आघाडीच्या विट्रीफाइड आणि ग्लेझ्ड टाइल्स उत्पादकांपैकी– एक असलेल्या कंपनीने गुजरातमधील इडर येथील गोरोल येथे ५ मेगावॅट डीसी सौर ऊर्जा प्रकल्पाची स्थापना करण्याची अभिमानाने घोषणा केली आहे. हा उपक्रम शाश्वतता, कार्यक्षमता आणि जबाबदार उत्पादनासाठी एक्सारोच्या वचनबद्धतेला बळकटी देतो.२५ वर्षे आणि ४ महिन्यांसाठी भाडेतत्त्वावर घेतलेल्या जमिनीवर उभारलेला हा सौर प्रकल्प गुजरातमधील तळोड येथील कंपनीच्या उत्पादन युनिटसाठी कॅप्टिव्ह वापरासाठी समर्पित आहे. हा प्लांट सध्या दरवर्षी सुमारे २१ दशलक्ष वीज युनिट वापरतो. सौर ऊर्जा आता ऑपरेशन्सला पूरक असल्याने, कंपनीला दरवर्षी अंदाजे ₹५.६७ कोटी बचतीची अपेक्षा आहे, ज्यामुळे युनिटमधील ऊर्जा खर्चात ३०% कपात होईल.ङ्ग''सौर प्रकल्प हा आमच्या व्यवसाय ऑपरेशन्सना जागतिक शाश्वतता उद्दिष्टांशी जोडण्यासाठी एक मोठे पाऊल आहे. हे केवळ आमची खर्च–कार्यक्षमता मजबूत करत नाही तर स्वच्छ ऊर्जा आणि पर्यावरणीय जबाबदारीप्रती आमची वचनबद्धता देखील दर्शवते,'' असे एक्सारो टाइल्स लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक श्री. मुकेशकुमार बी. पटेल म्हणाले.२००८ मध्ये स्थापित आणि गुजरातमधील अहमदाबाद येथे मुख्यालय असलेले एक्सारो टाइल्स लिमिटेड हे भारतीय सिरेमिक आणि विट्रिफाइड टाइल्स उद्योगात एक सुस्थापित नाव आहे.एक्सारो टाइल्स तालोद (साबरकांठा जिल्हा, गुजरात) आणि पाड्रा (वडोदरा जिल्हा, गुजरात) येथे स्थित दोन अत्याधुनिक उत्पादन सुविधा चालवते.एकत्रितपणे, या प्लांटची एकत्रित स्थापित क्षमता १,३२,००,००० चौरस मीटर प्रतिवर्ष आहे. ङ्गङ्ग३चला पर्यटनाला ङ्गचार भिंतीङ्गसातारा शहराच्या मध्यभागी, अजिंक्यतारा किल्ल्याच्या पायथ्याशी, चारभिंती हे एक भव्य स्मारक उभे आहे. हे स्मारक केवळ एक पर्यटनस्थळ नाही तर, मराठा साम्राज्याचा आणि स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास जपणारे एक ऐतिहासिक वारसा आहे.छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी १८३० मध्ये बांधलेली चारभिंती, मराठा राजघराण्यातील स्त्रियांना विजया दशमीच्या मिरवणुकीचे दर्शन घेण्यासाठी बांधण्यात आली होती. या ठिकाणाला नजर महाल म्हणूनही ओळखले जात होते.१८५७ च्या स्वातंत्र्यलढ्यात हुतात्मा झालेल्या वीरांच्या स्मृतिप्रीत्यर्थ या स्मारकाची उभारणी १८५८ मध्ये करण्यात आली. चारही बाजूंनी भिंती आणि मधोमध एक स्तंभ असलेले हे स्मारक, हुतात्म्यांच्या बलिदानाचे प्रतीक आहे.राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे, रंगो बापूजी गुप्ते यांसारख्या वीरांच्या आठवणींना



चारभिंतीत जतन करण्यात आले आहे.इंग्रजांविरुद्धच्या पहिल्या स्वातंत्र्य संग्रामाच्या १०० व्या वर्षपूर्तीला, २००१ मध्ये चारभिंतीचे नूतनीकरण करण्यात आले. आज, हे स्मारक सातारा शहराचे एक लोकप्रिय पर्यटनस्थळ बनले आहे. अजिंक्यतारा किल्ल्याला भेट देणाऱ्या पर्यटक हे स्मारक नक्कीच पाहतात.चारभिंती केवळ पर्यटकांसाठीच नाही तर, सातारा आणि आसपासच्या तरुणांसाठीही एक विशेष आकर्षण आहे. अनेक लोक येथे रोज फिरायला येतात आणि या ऐतिहासिक वास्तूचा आनंद घेतात.



संकलन संयोजन
सुबोध रणशेवरे
संपर्क –९८३३१४६३५६
इमेल –
subodh.ranshevre@rediffmail.com

दैनिक
# सूर्योदय
शनिवार ०५ जुलै २०२५
पान ४

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

## आईच्या द्वितीय स्मरणा प्रित्यर्थ शैक्षणिक साहित्य वाटप व भजनसेवा करून केले साजरे

विशेष प्रतिनिधी
नंदकुमार चांदोरकर

तळा तालूक्यातील शेनाटे गावातील सुनील जाधव या पुत्राने आई कै.शेवंतीबाई लक्ष्मण जाधव हिच्या द्वीतीय पुण्यस्मरण प्रित्यर्थ ''आई थोर तुझे उपकार'' या विषयावर मार्गदर्शन व आदिनाथ वारकरी सांप्रदाय किर्तन शेनाटे यांचा कार्यक्रम ठेऊन समाजालाएक वेगळा आदर्श घालून दिला आहे. लक्ष्मण जाधव, मुलगी अश्विनी तांदलेकर यांनी आयोजन केले होते शालेय साहित्य वाटप करून जन्मदाती आई व वडील याच्यांबद्दल प्रेम आदर असला पाहिजे. हे भावी पिढीला सांगण्याची गरज आहे हे आईच्या पूण्य स्मरणार्थ साहित्य वाटप करुन शिक्षण साहित्या अभावी माझ्या ग्रामीण भागातील विद्यार्थी वंचीत राहिला नाही पाहिजे या उदात्त हेतूने सामाजीक जाण राखत प्रार्थमिक शाळा शेनाटेगाव व आदिवासीवाडी येथील शाळेत साहित्य वाटप केले या पुण्यस्मरण प्रित्यर्थ महाप्रसादाचे आयोजन केले होते यावेळीअनेक मान्यवर, सामाजिक राजकीय कौटुंबिक नातेवाईक आणि विद्यार्थी पालक शिक्षक,भजनी मंडळी ग्रामस्थ उपस्थीत होते.





## तळसर, वालोपे, कान्हे मराठी या केंद्रांची संयुक्त शिक्षण परिषद संपन्न

चिपळूण प्रतिनिधी
प्रदीप पवार

नवीन शैक्षणिक वर्षातील पहिली शिक्षण परिषद जिल्हा परिषद आदर्श शाळा कळंबस्ते येथे घेण्यात आली. प्रारंभी कळंबस्ते शाळेच्या शिक्षिका सुनिता हळदे यांनी केंद्रीय प्रमुख वैशाली जाधव , सर्व मुख्याध्यापक , उपस्थित शिक्षक व ऐश्वर्या रेडिज यांचे स्वागत केले. केंद्रीय प्रमुख वैशाली जाधव व कळंबस्ते शाळेच्या मुख्याध्यापिका स्नेहल शिंदे , डॉ.सुधा भारद्वाज यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. यानंतर पिंपळी बुद्रुक शाळेच्या मुख्याध्यापिका सुविधा गांधी व त्यांच्या सहकाऱ्यांनी सुश्राव्य आवाजात प्रार्थना सादर केली. यानंतर सूक्ष्म शारीरिक हालचाली घेऊन मानसिक ताण कमी करून कामाची सुरूवात केली. गटकार्य करण्यासाठी उपस्थित शिक्षकांची इयत्तानिहाय आकर्षक पध्दतीने बैठक व्यवस्था करून गटांची निर्मिती करण्यात आली. माहे जुलै २०२५ च्या कृती आराखड्यानुसार अध्ययन निष्पत्तीवर आधारित मासिक नियोजन शिक्षण परिषदेत वर्गनिहाय तयार करण्यात आले. तयार केलेल्या नियोजनाचे गटनिहाय सादरीकरण करण्यात आले. दुसऱ्या सत्रात निपुण महाराष्ट्र अभियान अंतर्गत शिक्षण परिषदेतील मासिक नियोजन आणि पालकांनी मुलांच्या सोबत घरी करायच्या कृती आराखडा अंमलबजावणी व सुधारणात्मक बाबींवर / समस्यांवर चर्चा करून समस्या निराकरण करण्यावर भर देणे याविषयी केंद्रीय प्रमुख वैशाली जाधव यांनी माहिती दिली. शाळा व्यवस्थापन समिती पुनर्रचना - पुनर्गठण त्याचप्रमाणे शाळांवरील विविध समित्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत शासन निर्णयाचे वाचन करून त्या संदर्भात माहिती देण्यात आली. मुग्धा चिपळूणकर यांनी शिष्यवृत्ती परीक्षेतील आपल्या यशस्वी विद्यार्थ्यांचे गमक सांगुन क्लुप्त्यांबाबत मार्गदर्शन केले. सीआरजी सदस्यांची रचना, भूमिका व जबाबदारी याविषयी ग्यान प्रकाश फाउंडेशन प्रतिनिधीनी विजय माने यांनी माहिती दिली. प्रशासकीय कामकाजाबाबत केंद्रीय प्रमुख वैशाली जाधव यांनी आढावा घेतला. या शिक्षण परिषदेसाठी चिपळूण गटशिक्षणाधिकारी प्रमोदकुमार शेंडगे, चिपळूण नंबर २ प्रभागाचे विस्तार अधिकारी रमाकांत पवार , वालोपे केंद्राचे केंद्रीय प्रमुख सुर्वे उपस्थित होते. कळंबस्ते शाळेतील उपशिक्षिका मुग्धा चिपळूणकर यांनी आभार मानले.



## श्रीवर्धन - बोर्ली नालासोपारा रातराणी सुरु करा..रायगड मी मराठी प्रतिष्ठानची मागणी


द. रा. जि. उप संपादक:
संतोष उद्धरकर.

म्हसळा: श्रीवर्धन बोर्ली मार्गे नालासोपारा ही ११.३० वा रातराणी एस टी बस सेवा सुरु करण्यासाठी रायगड मी मराठी प्रतिष्ठानचे सचिव प्रफुल्ल तटकरे यांनी श्रीवर्धन आगार व्यवस्थापक यांची भेट घेऊन निवेदन देऊन मागणी करण्यात आली.

सविस्तर वृत्त असे कि, म्हसळा, श्रीवर्धन, बोर्ली या विभागातील असंख्य चाकरमनी नालासोपारा, वसई, विरार या ठिकाणी वास्तव्यास असल्याने अनेक वेळेला या लोकांचे श्रीवर्धन, म्हसळा येथे येणे जाणे असल्याने नालासोपारा मधुन श्रीवर्धन कडे येणाऱ्या तिन बस आहेत, आणि त्या श्रीवर्धन मधून ठराविक वेळेला सोडण्यात येतात, दिवसभराचे कामकाज असल्याने या बसने जाणे शक्य होत नाही, आणि खाजगी वाहन म्हटले कि जादा पैसे द्यावे लागत असल्याने रात्री ११.३० वा श्रीवर्धन - बोर्ली मार्गे नालासोपारा रातराणी एस टी बस सेवा सुरु करावी, जेणेकरून वेळेवर घरी जाणे शक्य होईल, प्रवाशांची व स्थानिकांची वाढती मागणी लक्षात घेऊन या संदर्भात श्रीवर्धन एस टी आगार व्यवस्थापक यांना लेखी निवेदन देऊन मागणी करण्यात आली. तसेच श्री रविप्रभा मित्र संस्थेकडे देखील या संदर्भात चर्चा करून आपण या साठी प्रयत्न करावे अशी अध्यक्ष यांना विनंती देखील करण्यात आली.

चालक आणि वाहन उपलब्ध नसल्याने जादा गाडी सुरु करणे शक्य होत नाही, पुढील सण व प्रवाशांची मागणी लक्षात घेता लवकरात लवकर ही गाडी सुरु करण्याचा प्रयत्न करतो. मेहबुब मणियार. व्यवस्थापकङ्गश्रीवर्धन आगार.






## शिवसेना (उ.बा.ठा.) पक्षाच्या वर्धापन दिनानिमित्त गरजु विद्यार्थ्यांना शालेपयोगी वस्तू वाटप







विशेष प्रतिनिधी :
नंदकुमार चांदोरकर

दि.३०/०६/२०२५ रोजी शिवसेना (उ.बा.ठा.) पक्षाच्या ५९ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून श्रीवर्धन तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळांमध्ये मेघरे,गुळथे,बापवळी, हुनरवेळी,भोस्ते,वेळास, वाळवटी,पुनीर,चिखलप, शिरवणे,नागरोलो,वाकलघर, ह्या शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यां -विद्यार्थिनींना श्रीवर्धन तालुक्यातील शिवसैनिकांकडुन शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.ङ्गत्या प्रसंगी नवी मुंबई वाशी युवासेना उपअधिकारी महेश सुर्वे,यांच्या समवेत संजय कोमनाक,गजानन कदम, प्रसाद बारे, राकेश खराडे व शिवसैनिकांनी पदाधिकारी उपस्थित होते.

भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती), संपर्क : ९०४९८११०६५ मु. भिंगळोली पो.ता.मंडणगड जि.रत्नागिरी, कोकण विभागीय कार्यालय पत्ता : निलेश महादेव आखाडे ०६ र.न.प.वसाहत नाचणे रोड रत्नागिरी.४१५६१२

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड- ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )